दिनांकः- १३/१२/२०२२

# प्रेस नोट

## पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई.

## ४७ वी कोंकण परिक्षेत्रिय पोलीस क्रीडा स्पर्धा २०२२

४७ वी कोंकण परिक्षेत्रिय पोलीस क्रिडा स्पर्धा २०२२ पोलीस मुख्यालय,कळंबोली, नवी मुंबई येथे दिनांक ०९/१२/२०२२ ते १४/१२/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेमध्ये कोंकण परिक्षेत्रातील नवी मुंबई, ठाणे ग्रामीण, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर असे ०६ जिल्हांचे संघ सहभागी झाले आहेत.

दिनांक १३/१२/२०२२ रोजी झालेल्या सामन्यांमध्ये फुटबॉल (पुरूष) क्रीडा प्रकारात रायगड, ठाणे ग्रामीण व पालघर हे संघ विजयी झाले आहेत. खो-खो (पुरुष) सामन्यामध्ये पालघर, रायगड, सिंधुदुर्ग व खो-खो (महिला) गटात नवी मुंबई, ठाणे ग्रामीण व सिंधुदुर्ग या संघानी विजय मिळविलेला आहे. व्हॉलीबॉल (पुरूष) गटात रायगड व महिला गटात रायगड, ठाणे ग्रामीण व सिंधुदुर्ग हे संघ विजयी झाले आहेत. हॉकी (पुरूष) क्रीडा प्रकारात रत्नागिरी, रायगड, व ठाणे ग्रामीण हे संघ विजयी झाले आहेत. हॅन्डबॉल (पुरुष) सामन्यांमध्ये ठाणे ग्रामीण हा संघ विजयी झाला आहे. ४X४०० मी. रिले (पुरूष/महिला) क्रीडा प्रकारात रायगड व रत्नागिरी हे संघ विजयी झाले आहेत.

वैयक्तिक क्रिडा प्रकारात ३०००.मी स्ट्रीपल चेस (पुरुष) तुषार पवार, नवी मुंबई यांनी प्रथम क्रमांक पटकविला आहे. लांब उडी (महिला) गटात मंजिरी रेवाळे, रत्नागिरी यांनी प्रथम क्रमांक पटकविला आहे. थाळीफेक (पुरुष) आफताब सय्यद, पालघर हे विजयी झाले आहेत. वु-शू (पुरूष/महिला) क्रीडा प्रकारात नवी मुंबई या संघाने चॅम्पियनशिप मिळविलेली आहे.

दि.१४/१२/२०२२ रोजी १६:०० वा. ४७ वी कोंकण परिक्षेत्रिय क्रीडा स्पर्धा २०२२ या स्पर्धेचे औपचारिक रित्या समारोप समारंभ पोलीस मुख्यालय परेड मैदान, कळंबोली, नवी मुंबई याठिकाणी मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे अध्यक्षतेखाली व मा. पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र यांच्या उपस्थिती संपन्न होणार आहे.